प्रेस नोट ता. १४/०९/२०२४

# मोक्का गुन्हयातील पाहीजे आरोपीला पिस्टलसह अटक

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

पिंपरी चिंचवड :- मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे साहेब यांनी आगामी विधानसभा निवडणुक व श्री गणेशोत्सव २०२४ इत्यादी महत्वाचे सण उत्सव सुरळीत पार पडणेसाठी अवैध शस्त्रे बाळगणारे गुन्हेगारांची माहीती मिळवुन कायदेशीर कारवाई करणेबाबत गुन्हे शाखांना आदेशीत केले आहे.

गुन्हे शाखा पोलीस उप आयुक्त संदीप डोईफोडे व सहा. पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी गुन्हे शाखा युनिट २ चे पथक तयार करुन विशेष मोहीम राबवित असतांना दिनांक १३/०९/२०२४ रोजी पेट्रोलिंग दरम्यान पोलीस अंमलदार अजित सानप व नामदेव कापसे यांना त्यांचे गोपनिय बातमीदाराकरवी बातमी मिळाली आहे कि, एक इसम अंदाजे २५ ते ३० वर्षे वयाचा पिस्टल सारखे हत्यार कमरेला लावुन एच ए ग्राउंड नेहरुनगर पिंपरी येथे आला आहे अशी खात्रीशी बातमी मिळाली.

पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी पोलीस उप निरीक्षक गणेश माने व स्टाफ यांना सुचना मार्गदर्शन करुन एच ए ग्राउंड नेहरुनगर पिंपरी भागात रवाना केले. सदर पथक बातमीचे ठिकाणी सापळा लावुन थांबले असतांना बातमीदाराने सांगितलेल्या वर्णनाचा एक इसम एच ए ग्राउंडचे कॉर्नरला संशयितरित्या फिरत असलेला दिसला त्याचवेळी संशयित इसमाला पोलीस आल्याची चाहूल लागल्याने पळुन जात असतांना व कमरेला लावलेले पिस्टल काढण्याचे प्रयत्नात असतांना पोलीस पथकाने पाठलाग करुन त्याचेवर झडप घालुन अत्यंत धाडसाने व शिताफीने पकडले. त्याचे कमरेला लावलेले पिस्टल व जिवंत राउंड ताब्यात घेतले. त्याचे नाव दिलीप उर्फ पाजी उर्फ सरदार इंद्रजीत चौहाण वय २९ वर्षे रा. नेहरुनगर पिंपरी असे आहे.

सदर आरोपी हा प्राणघातक हल्ले करुन जबरीचोरीचे गुन्हे करणारा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन तो त्याचे साथीदारासह संघटीत गुन्हेगारी करीत असल्याने एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ३४२/२०२४ भारतीय न्याय संहीता (बीएनएस) कलम ३११, ३५२, ३३३, ३५१ (२), ११५ (२) ३ (५) , महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी कायदा कलम ३ (१) **(ii)** ३ (४) प्रमाणे मोक्का गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयामध्ये दिलीप उर्फ पाजी उर्फ सरदार इंद्रजीत चौहाण हा पाहीजे आरोपी असुन गुन्हा दाखल झाल्यापासुन तो पळुन गेला होता व वेळोवेळी त्याची राहण्याची ठिकाणे बदलुन, त्याचे अस्तित्व लपवुन फिरत होता. आरोपीचे कब्जातुन ०१ देशी बनावटीचे पिस्टल व ०१ जिवंत काडतुस असे एकूण ५०५००/- रुपये किंमतीचे अग्निशस्त्र जप्त करण्यात आले असुन अधिक तपास सुरु आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त श्री शशिकांत महावरकर , अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री संदिप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र कदम, पोलीस उप निरीक्षक गणेश माने, दिलीप चौधरी, उषा दळे, अजित सानप, नामदेव कापसे, देवा राऊत यांनी केली आहे.

(संदिप डोईफोडे)

पोलीस उप आयुक्त गुन्हे

पिंपरी चिंचवड